**<u>ठळक बातम्या</u>**

- इराण आणि अमेरिकेत शुक्रवारी शांतता करारावर स्वाक्षरी होणार, शेजारी देशातलं सैन्य मागे घ्यायला इस्राइलचा नकार

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यात भारताचे स्लोवाकियासोबत ११ करार

- राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन २२ जून ते १० जुलै दरम्यान मुंबईत होणार

- उन्हाळी हंगामात केलेली १० टक्के भाडेवाढ आणखी महिनाभर कायम ठेवण्याचा एसटी महामंडळाचा निर्णय

आणि

- एकोणिसाव्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला सुरुवात

**<><><><><>**

इराण आणि अमेरिका यांच्यात शांतता करार करायला दोन्ही देशांनी सहमती दर्शवली आहे. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून धुमसणाऱ्या पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या करारानंतर अमेरिकेने इराणच्या बंदराची केलेली नाकेबंदी उठेल तसंच लेबननसह सर्व ठिकाणच्या कारवाया थांबतील, असं इराणचे उप परराष्ट्र व्यवहार मंत्री काझम घरीबाबादी यांनी आज प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना सांगितलं. इराण आणि अमेरिका १९ जूनला स्वित्झर्लंड इथं शांतता स्थापन करण्यासाठी सामंजस्य कराराच्या अंतिम मसुद्यावर स्वाक्षऱ्या करतील असं ते म्हणाले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही समाजमाध्याद्वारे याला दुजोरा दिला. हा करार पूर्ण झाला असून यानंतर होर्मुजच्या सामुद्रधुनीचा मार्ग खुला होईल असं ते म्हणाले.

संयुक्त राष्ट्राचे महासचिव एँतिनियो गुटेरस यांच्यासह जगभरातल्या नेत्यांनी या कराराचं स्वागत केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इराण-अमेरिका शांतता कराराचं स्वागत केलं आहे. यामुळे पश्चिम आशियात शांतता आणि स्थैर्य स्थापन होईल आणि मुक्त व्यापाराचा मार्ग मोकळा होईल, असं मोदी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाले.

**<><><><><>**

शस्त्रसंधी करारानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सैन्य मागे घेण्यासाठी दिलेलं वेळापत्रक पाळायला इस्त्राइलनं नकार दिला आहे. लेबनन, सीरिया आणि गाझामधल्या सुरक्षा झोनमधून सैन्य हटवायला इस्त्राइलनं नकार दिला आहे. इस्त्राइली नागरिकांच्या सुरक्षेसाठी इस्त्राइली सैन्य कायम राहणार असल्याचं इस्त्राइलचे संरक्षण मंत्री इस्त्राइल काट्झ म्हणाले.

**<><><><><>**

भारत आणि स्लोव्हाकियानं आज आपल्या संबंधांना 'सर्वसमावेशक भागीदारी'चा दर्जा दिला, तसंच द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यासाठी ११ करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्लोव्हाकियाचे प्रधानमंत्री रॉबर्ट फिको यांच्यातल्या चर्चेनंतर हे करार करण्यात आले. कामगार स्थलांतर, संरक्षण, डिजिटल तंत्रज्ञान, उच्च शिक्षण आणि क्वांटम कम्युनिकेशन या क्षेत्रांमधे हे करार करण्यात आले. 'सामाजिक सुरक्षा करारा'च्या जलद लवकर पूर्ततेसाठी काम करण्याबाबतही दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली. या करारामुळे भारत आणि स्लोव्हाकिया दरम्यान ये-जा करणाऱ्या किंवा कार्यरत असलेल्या व्यावसायिकांचं कल्याण आणि सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यास मदत होईल.

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातल्या मुक्त व्यापार कराराची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याच्या दिशेनं काम करण्यासही दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शवली. अणुऊर्जा आणि भू-औष्णिक ऊर्जेसह विविध ऊर्जा स्रोतांचा वापर करून ऊर्जा सुरक्षा, शाश्वतता आणि लवचिकता यांना चालना देण्याच्या उद्देशानं, ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावरही दोन्ही नेत्यांचे एकमत झालं. त्यानंतर संयुक्त निवेदनात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, आजची भेट भारत आणि स्लोवाकियाच्या मैत्रीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली, याचा दोन्ही देशातल्या व्यापार, स्टार्टअप्स आणि उद्योगाला लाभ होईल, त्यामुळे या कराराच्या अंमलबजावणीसाठी दोन्ही देश प्रयत्न करतील असं प्रधानमंत्री म्हणाले.

- - **होल्ड बाईट मोदी** - -

संयुक्त राष्ट्राच्या संरक्षण परिषदेत भारताचा समावेश कायमस्वरूपी सदस्य म्हणून व्हायला हवा, असं स्लोवाकियाचे प्रधानमंत्री रॉबर्ट फिको म्हणाले. भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातल्या मुक्त व्यापार कराराचं फिको यांनी स्वागत केलं. तसंच भारतासोबत संरक्षण क्षेत्रात काम करण्यासाठी स्लोवाकिया उत्सुक आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

रशियानं काल रात्री युक्रेनची राजधानी कीएव आणि खार्किव या शहरांवर अनेक ड्रोन आणि क्षेपणास्त्रांद्वारे हल्ला केला, अशी माहिती युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेंस्की यांनी दिली. या हल्ल्यात सुमारे ११ जणांचा मृत्यू झाला. झेलेंस्की यांनी कालच अमेरिकेचे अध्यक्ष ट्रंप आणि रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला होता. फ्रान्समध्ये सुरू असलेल्या जी-७ शिखर परिषदेतही रशिया - युक्रेन युद्धावर चर्चा होणार आहे.

<><><><><>

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या २२ तारखेपासून १० जुलैपर्यंत मुंबईत होणार आहे. मुंबईत आज विधानभवनात आयोजित विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. बैठकीत अधिवेशनाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांनी कामकाजाची माहिती दिली.

विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार या बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

एस टी अर्थात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळानं आपल्या सामान्य बस सेवांवरची १० टक्के हंगामी भाडेवाढ आणखी एक महिना कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. इंधनाचे वाढते दर आणि कर्मचाऱ्यांवरील वाढत्या खर्चामुळे या दर वाढीची मुदत वाढवली आहे, सध्याचा वाढीव भाडेदर १५ जुलैच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील, असं महामंडळानं आज जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. उन्हाळी प्रवासाच्या हंगामात महसूल वाढवण्यासाठी एसटीनं १५ एप्रिल रोजी लागू केलेली हंगामी भाडेवाढ आज संपणार होती.

<><><><><>

NTA अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी होणाऱ्या NEET UG फेरपरीक्षेची प्रवेशपत्रं जारी केली आहेत. उमेदवार <u>neet.nta.nic.in</u>

या NTA च्या अधिकृत संकेतस्थळावरून आपली प्रवेशपत्रं डाउनलोड करू शकतात. ही फेरपरीक्षा या महिन्याच्या २१ तारखेला दुपारी दोन ते सायंकाळी सव्वा पाच या वेळेत होणार आहे.

<><><><>

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत बोरिवलीसह देशभरातल्या गर्दीच्या रेल्वे स्थापनांच्या पुनर्विकास प्रकल्पांचा आढावा घेतला. या अंतर्गत बोरिवली स्थानकात अतिरीक्त फलाट, नवे पूल, नवीन लिफ्ट, प्रवाशांसाठी अतिरीक्त जागा यासारख्या विविध सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहे. बोरिवलीसह कांदिवली स्थानकाचा विकास करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत झाला. बोरिवली स्थानकातली गर्दी कमी करण्याचं याद्वारे नियोजन आहे.

<><><><>

एकोणिसाव्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून सुरुवात झाली. या महोत्सवाचा उद्घाटन समारंभ माहिती प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत मुंबईत झाला. भारताच्या कहाण्यांमध्ये संपूर्ण जगाला प्रेरणा देण्याची ताकद असल्याचं राज्यमंत्री मुरुगन यावेळी म्हणाले. देशभरातल्या सर्जनशील नागरिकांनी मुंबईत यावं आणि त्यांच्या कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मुंबईतल्या सोयीसुविधांचा उपयोग करावा, असं आवाहन आशिष शेलार यांनी यावेळी केलं. डिजिटल मंच, ओटीटी, चित्रपट महोत्सव यामुळं माहितीपट आणि लघुपटाला व्यावसायिक यश मिळत असल्याचं प्रतिपादन माहिती प्रसारण सचिव चंचल कुमार यांनी केलं.

या वर्षीच्या स्पर्धा विभागात १४४ चित्रपटांचा समावेश आहे; यात १३ देशांतील चित्रपट निर्मात्यांच्या ५२ आंतरराष्ट्रीय आणि ९२ राष्ट्रीय प्रवेशिकांचा समावेश आहे. स्पर्धा-बाह्य विभागात ४६ सहभागी देशांमधले एकूण २०२ चित्रपट दाखवले जातील. 'वेव्हज डॉक बाजार' विभागात यावर्षी एकूण १५५ प्रवेशिका असून त्यासोबतच 'वर्क इन प्रोग्रेस' लॅबमधले ५ प्रकल्प आणि 'फिल्म बाजार रेकमेंड्स' अंतर्गत १२ चित्रपटांचा समावेश असेल.

<><><><>

अमेरिका-इराण शस्त्र संधीच्या आशेनं देशातल्या शेअर बाजारात आज सलग दुसऱ्या सत्रात मोठी तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ७३६ अकांची वाढ झाली  आणि तो ७६ हजार २६४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २३१ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ८५४ अंकावर बंद झाला.

//<><><><><>//